सार्वजनिक आरोग्य विभागातील आरोग्य सेवा संचालनालयातील महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ व राज्य कामगार विमा योजनेतील महाराष्ट्र वैद्यकीय विमा सेवा,गट-अ मधील वैद्यकीय अधिकारी व वरिष्ठ अधिकाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय ६० वरुन ६२ वर्षापर्यंत वाढविणेबाबत....

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग

शासन निर्णय क्रमांकः सेवानि-१३१९/प्र.क्र.४८/सेवा-२

गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल इमारत, १० वा मजला

मंत्रालय, मुंबई-४०० ००१

दिनांक: ०१ जुलै, २०१९

वाचा :-

१) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांकः सेवानि-११८/प्र.क्र.१६८/सेवा-२, दि. २९.०८.२०१८

२) आरोग्य सेवा संचालनालयाचे पत्र क्र.संआसे/कक्ष-१/टे-१/गट-अ/सेनिवय/६९०-६५/वैअ/१८२३/ २०१९, दि. १६.०५.२०१९

प्रस्तावना :-

राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाकडून सामान्य रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये, ग्रामीण रुग्णालये राज्य कामगार विमा रुग्णालये यामधून रुग्णांना आरोग्य सुविधा पुरविण्यात येतात. तथापि, सदर रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी व वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या कमतरतेमुळे रुग्णाना वेळेत योग्य आरोग्य सुविधा पुरविण्यात अडचणी निर्माण होत आहेत. वैद्यकीय अधिकारी तसेच विशेषज्ञ पदासाठी प्रयत्न करुन देखील पुरेशा प्रमाणात वैद्यकीय अधिकारी उपलब्ध होत नाहीत वा उपलब्ध झाल्यासही पसंतीच्या ठिकाणी पदस्थापना न मिळाल्यास सेवेत रुजू न होण्याचे प्रमाण मोठे आहे. परिणामी आरोग्य सेवेतील पदे मोठ्या प्रमाणात रिक्त राहत असून त्याचा राज्यातील रुग्णसेवेवर विपरित परिणाम होत आहे. त्यानुसार सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय दि.२९.८.२०१८ नुसार आरोग्य सेवा संचालनालयातील महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ मधील वैद्यकीय अधिकारी (वेतनबँड रु. १५६००-३९१०० ग्रेड पे रु. ५४००) व जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी व विशेषज्ञ संवर्ग (वेतनबँड रु. १५६००-३९१०० ग्रेड पे रु. ६६००) मधील पदे व वरिष्ठ पदे (वेतनबँड रु. १५६००-३९१०० ग्रेड पे रु. ६६०० वरील) व राज्य कामगार विमा योजनेतील महाराष्ट्र वैद्यकीय विमा सेवा, गट-अ (वेतनबँड रु. १५६००-३९१०० ग्रेड पे रु. ५४०० व त्यावरील सर्व) वैद्यकीय अधिकाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय ५८ वर्षावरुन ६० वर्षापर्यंत वाढविण्याचा शासनाने

निर्णय घेतला आहे. सदर निर्णय दि. ३१.५.२०१८ पासून पूर्वलक्षी प्रभावाने पाच वर्षासाठी (दि. ३१.५.२०२३ पर्यंत) लागू करण्यात आला आहे.

महाराष्ट्राच्या विविध भागातून विविध सामाजिक संघटना, समाजसेवक, लोकप्रतिनिधी यांनी डॉक्टरांच्या रिक्त पदांबाबत चिंता व्यक्त केली असून सेवानिवृत्ती वय वाढविण्याबाबत निवेदने सादर केली आहेत. दैनदिन जीवनात आरोग्य सेवेचे अनन्य साधारण महत्व लक्षात घेता, रिक्त असणाऱ्या पदांचा विचार करुन आणि सेवानिवृत्तीमुळे रिक्त पदांमध्ये वाढ होऊन जन आरोग्याचा धोका विचारात घेऊन महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा,गट-अ (६ व्या वेतन आयोगानुसार ग्रेड पे रु. ५४०० व त्यावरील) मधील अधिकाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय ६२ वर्षापर्यंत वाढविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

सार्वजनिक आरोग्य विभागांच्या अधिपत्याखालील आरोग्य सेवा संचालनालयातील महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा,गट-अ मधील संचालक, अतिरिक्त संचालक, सहसंचालक, उपसंचालक व जिल्हा आरोग्य अधिकारी यांचे कार्यालयाचा तसेच राज्य कामगार विमा योजना कार्यालयातील महाराष्ट्र वैद्यकीय विमा सेवा, गट-अ मधील संचालक (वैद्यकीय), उपसंचालक (वैद्यकीय) व वैद्यकीय अधिक्षक (उच्चश्रेणी), वैद्यकीय अधिक्षक (निम्नश्रेणी) यांचा समावेश प्रशासनिक सेवेमध्ये करण्यात येत असून, सदर ठिकाणी कार्यरत असणाऱ्या अधिकाऱ्यांचे (सेवानिवृत्तीचे सध्याचे वय ६० वर्षे दि. ३१.५.२०२३ पर्यंत) सेवानिवृत्तीचे वय न वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच सदर पदावरील अधिकारी वगळता आरोग्य सेवा संचालनालयातर्गंत महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा,गट-अ (६ व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी रु. १५६००-३९१०० ग्रेड पे रु. ५४०० व त्यावरील) व राज्य कामगार विमा योजना कार्यालयातील महाराष्ट्र वैद्यकीय विमा सेवा,गट-अ मधील (६ व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी रु. १५६००-३९१०० ग्रेड पे रु. ५४०० व त्यावरील) जे वैद्यकीय अधिकारी थेट रुग्णसेवा देतात त्या अधिकाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय २ वर्षासाठी ६० वरुन ६२ वर्षापर्यंत (दि. ३१.५.२०२१ पर्यंत) (दि. ३१.०५.२०१९ पासून पूर्वलक्षी प्रभावाने) वाढविण्यासंबंधीचा प्रस्ताव मा. मंत्रीमंडळासमोर सादर करण्याच्या अटीच्या अधीन राहून त्यांच्या वयाची ६२ वर्षे पूर्ण होईपर्यत त्यांना शासन सेवेत ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

३. सदर शासन निर्णय हा प्रशासनिक पदावर कार्यरत असलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना लागू राहणार नाही. जे वैद्यकीय अधिकारी रुग्णसेवा देण्यात येत असलेल्या पदावर कार्यरत राहतील त्यांनाच ही वयोमर्यादेतील वाढ लागू राहील. तसेच जोपर्यंत ते रुग्णसेवा देत असलेल्या पदावर कार्यरत राहतील, तोपर्यंतच सदर वयोमर्यादेतील वाढ लागू राहील.

४. शासन निर्णय दि. २९.०८.२०१८ अन्वये आरोग्य सेवा संचालनालयातील महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ मधील वैद्यकीय अधिकारी (वेतनबँड रु. १५६००-३९१०० ग्रेड पे रु. ५४००) व जिल्हा

शल्य चिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी व विशेषज्ञ संवर्ग (वेतनबँड रु. १५६००-३९१०० ग्रेड पे रु. ६६००) मधील पदे व वरिष्ठ पदे (वेतनबँड रु. १५६००-३९१०० ग्रेड पे रु. ६६०० वरील) व राज्य कामगार विमा योजनेतील महाराष्ट्र वैद्यकीय विमा सेवा, गट-अ (वेतनबँड रु. १५६००-३९१०० ग्रेड पे रु. ५४०० व त्यावरील सर्व) वैद्यकीय अधिकाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय ५८ वरुन ६० वर्षे दि. ३१.५.२०१८ पासून पूर्वलक्षी प्रभावाने पाच वर्षासाठी (दि. ३१.०५.२०२३ पर्यंत) लागू करण्यात आले आहे. सदर शासन निर्णयातील तरतूदी या पुढेही तशाच लागू राहतील.

५. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. १०४/१९/सेवा-४, दि. ०६.०६.२०१९ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०६२९१००३५४९०१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vishnudas Pundlikrao Ghodke

Digitally signed by Vishnudas Pundlikrao Ghodke
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=514c2e5ad6ac71c69b99a86a5fe5189556b7a95d5896bbb81496f403bb58ac3e, serialNumber=9ab69d6945f8950a9525831f8ae9726be295d17576e78d19fa8f6cb952bb04a0, cn=Vishnudas Pundlikrao Ghodke
Date: 2019.07.01 15:59:20 +05'30'

(वि. पुं. घोडके)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव
२. मा. मुख्य सचिव महाराष्ट्र राज्य
३. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
४. मा. मंत्री (आरोग्य/मा. राज्यमंत्री (आरोग्य) यांचे खाजगी सचिव
५. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
६. आयुक्त, राज्य कामगार विमा योजना, मुंबई
७. मुख्य कार्यकारी अधिकारी, महात्मा फुले जीवनदायी आरोग्य योजना,मुंबई
८. प्रकल्प संचालक, महाराष्ट्र एड्स नियंत्रण सोसायटी मुंबई
९. सह पोलीस आयुक्त (प्रशासन), पोलीस आयुक्त कार्यालय,मुंबई
१०. जिल्हाधिकारी (सर्व)
११. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)

१२. संचालक, आरोग्य सेवा, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
१३. अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा (सर्व)
१४. सह संचालक, आरोग्य सेवा (सर्व)
१५. उपसंचालक, आरोग्य सेवा (सर्व)
१६. जिल्हा शल्यचिकित्सक (सर्व)
१७. जिल्हा आरोग्य अधिकारी (सर्व)
१८. पोलीस शल्य चिकित्सक, नागपाडा पोलीस रुग्णालय, मुंबई
१९. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर
२०. महालेखापाल, (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर
२१. अधिदान व लेखाअधिकारी, मुंबई
२२. जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)
२३. उपसचिव, सेवा-४, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
२४. सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई
२५. प्रधान सचिव (सा.आ.) यांचे स्विय सहायक
२६. सहसचिव/उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
२७. निवड नस्ती-सेवा-२